स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

"वाणिज्य आणि व्यवस्थापन" या विद्याशाखेअंतर्गत
"वाणिज्य" या विषयातील पीएच.डी. पूर्व संशोधन आराखडा

संशोधनाचा विषय

"नांदेड जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या आर्थिक व सामाजिक विकासात सहकारी बँकांची भूमिका"

संशोधक

सारिका संजय रताळे

मार्गदर्शक

डॉ. रेश्मा डोईफोडे

एम. कॉम., डी. बी. एम., एम.फिल., पिएच.डी.

वाणिज्य विभाग

पीपल्स कॉलेज नांदेड.

संशोधन केंद्र

पीपल्स कॉलेज नांदेड.

डिसेंबर २०२४

नांदेड जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या आर्थिक व सामाजिक विकासात सहकारी बँकांची भूमिका

प्रस्तावणा-

सहकार हे माणसाच्या प्रगतीचे एक महत्त्वाचे साधन आहे. माणसांच्या एकमेकांच्या सहवासातून सहकार ही संकल्पना मानवी उत्क्रांतीच्या प्राथमिक अवस्थेपासून अस्तित्वात आहे. "विना सहकार नाही उद्धार" तसेच "एकमेका सहाय्य करू अवघे धरू सुपंथ" या उप्तीप्रमाणे सहकार हा मानवी जीवनाचा अविभाज्य घटक आहे. मनुष्य हा समाजशील प्राणी आहे असे प्लेटो हा ग्रीक विचारवंत सांगतो. सहकार म्हणजे एकमेकांना मदत करणे कौटुंबिक व सामाजिक जीवनात एकत्रित राहणे व एकत्रित काम करणे असाही त्याचा अर्थ होतो. सहकार आणि सहजीवन यांचा जवळचा संबंध आहे. सहकारांमध्ये अडचणीच्या काळात व्यक्तींना एकत्रित काम करणे व एकमेकांना मदत करण्यासाठी केलेल्या सामूहिक प्रयत्नांचाही समावेश होतो. सर्वांनी मिळून एकत्रित काम करणे याला सहकारात अनन्यसाधारण महत्त्व आहे. शिवाय सहकार ही एक स्वभाविक प्रेरणा आहे. एकमेकांना मदत करून एकमेकांच्या आर्थिक फायदा घेणे हा सहकाराचा अर्थ आहे. अशा एकमेकांच्या सहकारातून स्थापन झालेल्या बँकेला सहकारी बँक असे म्हणतात. अशा सहकारी बँकेच्या माध्यमातून शेतकऱ्यांचा आर्थिक व सामाजिक विकास होण्यास मदत होते. शिवाय सहकार ही एक स्वभाविक प्रेरणा आहे एकमेकांना मदत करून एकमेकांचा आर्थिक फायदा करणे हा सहकाराचा अर्थ आहे.

एकमेकांना सहकार्य करणे हा मानवी जीवनाचा मूलतः स्वभावच आहे. मानवी जीवनातील सहकार्य-सहकार हे निसर्गत:च आहे. सहकारामुळेच समाज एक संघ राहतो. सहकाराने समाजाच्या आर्थिक सामाजिक शैक्षणिक व राजकीय क्षेत्रात मोठे योगदान आहे. मानवी जीवनाच्या स्थैर्यापासून सहकार महत्त्वाचा आहे अलीकडच्या काही

शतकापासून सहकार या शब्दाला अनन्यसाधारण महत्त्व आलेले आहे. अगदी प्राचीन काळापासून सहकार हा मानवी संस्कृतीचा भाग बनला आहे. मानवी विकासाच्या सुरुवातीच्या काळापासून धार्मिक संकल्पनेमध्ये परंपरा, चालीरीती आणि धर्मसंस्थांमध्ये सहकार्याची मूल्य रुजवलेली दिसतात. भारतात शेकडो वर्षांपूर्वी होऊन गेलेल्या अनेक संतांची शिकवण देखील सहकारावरच आधारित आहे. सर्व धार्मिक संस्थांमधील दुर्बलतांना मदत करणे आपल्या आनंदात व दुःखात इतरांना सामावून घेणे इत्यादी बाबी सहकारच शिकवत असतो. सहकार या शब्दाला आर्थिक व सामाजिक क्षेत्रात सुद्धा महत्त्व आहे. आर्थिक व सामाजिक क्षेत्रात एकमेकांना आर्थिक मदत करणे हा आर्थिक वित्तीय सहकाराचा मूलभूत स्वभाव आहे.

सहकार - अर्थ व व्याख्या:

सहकार या शब्दाला इंग्रजी मध्ये co-operation असे म्हणतात. हा शब्द लॅटिन भाषेतील Co-operati या शब्दापासून आला आहे. यातील Co म्हणजे सह किंवा एकत्रित व operati म्हणजे कार्य करणे असा होतो. यावरून असे स्पष्ट होते की, समाजातील अनेक लोकांनी सर्वांच्या गजरा पूर्ण करण्यासाठी एकत्रित काम करणे होय. ज्या गरजा किंवा कामे कोणत्याही व्यक्ती एकट्याने किंवा वैयक्तिकरित्या पूर्ण करू शकत नाही अशा अनेक गरजा एकमेकांच्या साह्याने पूर्ण केल्या जातात. एका विशिष्ट हेतूने अनेक व्यक्ती एकत्र येतात व एकमेकांच्या सहकार ने आपल्या विविध गरजा पूर्ण करण्यासाठी संस्था स्थापन करतात यास सहकारी संस्था असे अशा प्रकारची एक संस्था म्हणजे सहकारी बँका होय. विविध तज्ज्ञांनी सहकार्याची वेगवेगळी व्याख्या केलेली आहेत त्या पुढीलप्रमाणे आहेत.

सहकाराच्या व्याख्या :

आंतरराष्ट्रीय सहकार संघटन १९९५ :

"आर्थिक विकास, सामाजिक उद्दिष्टे व सामाजिक परिवर्तनासाठी झटणाऱ्या व

सांस्कृतिक विकास साध्य करण्यासाठी सहकाराची तत्वे अबाधित राखून सहकारी तत्त्वावर काम करणाऱ्या व्यावसायिक संघटनांना सहकार संस्था असे म्हणतात".

सी. आर. फे. :

"सहकार संस्था म्हणजे दुर्बललांनी निस्वार्थी भूमिकेतून संयुक्तरीत्या व्यवसाय करण्यासाठी स्थापन केलेली संघटना होय.या संस्थेच्या कामकाजात व संस्था चालविण्याच्या जबाबदारीच्या प्रमाणात सभासदांना लाभांश मिळेल असे गृहीत धरले जाते".

कॅमलसन :

"सामाजिक आशय असलेले कार्यपद्धती म्हणजे सहकार होय".

श्री वैकुंठलाल मेहता :

"समान गरजा असलेल्या व्यक्तींनी एकत्र येऊन आपल्या समान आर्थिक उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी स्वेच्छेने स्थापन केलेल्या संघटन प्रकार म्हणजे सहकारी संस्था होय".

सहकारी बँका :

सहकारी बँका म्हणजे विशिष्ट समुदायाच्या भांडवली गरजा पूर्ण करण्यासाठी व्यक्तींच्या गटाने एकमेकांच्या सहकार्यातून सुरू केलेली एक छोटी वित्तीय संस्था होय. अशा वित्तीय संस्था सर्व सदस्यांच्या मालकीच्या असतात अशा बँकेवर त्या सदस्यांचे नियंत्रण असते. सहकारी बँकेचे कामकाजावर देखरेख करण्यासाठी बँकेच्या सदस्याकडून लोकशाही मार्गाने मंडळाची निवड करण्यात येते. सहकारी बँका ह्या सहकार तत्वावर काम करतात आणि त्या सदस्यांच्या मालकीचे असतात. एखाद्या समुद्राच्या आर्थिक आर्थिक गरजा पूर्ण करण्यासाठी, लोक संसाधने एकत्र करण्यासाठी आणि कर्ज बचत खाते इत्यादी सारख्या बँकिंग सेवा प्रदान करण्यासाठी सहकारी बँका महत्त्वाची भूमिका पार पाडतात.

सहकारी बँकेचे कार्य :

सहकारी बँका ह्या पारंपरिक बँका पूरवत असलेल्या सर्व मूलभूत बँकिंग सेवा देण्याचा प्रयत्न करतात. परंतु सहकारी बँका ह्या पारंपारिक बँकेपेक्षा शेतकऱ्यांसाठी अधिक उपयोगी ठरतात. त्यामुळे शेतकऱ्याचा आर्थिक दर्जा उंचावण्यात मदत होते.

बचत आणि ठेव खाती -

बँकेचा सदस्य किंवा ग्राहक सहकारी बँकेत बचत खाते उघडू शकतो आणि शिल्लक रकमेवर व्याज मिळण्यासाठी त्यांनी बचत जमा करू शकतात.शिवाय व्यवसाय रोजगार व्यवहारात हे चालू खाते उघडू शकतात.

कर्ज आणि पत सुविधा -

सहकारी बँका या सदस्यांना वैयक्तिक कर्ज, ग्रह कर्ज, कृषी कर्ज, आणि व्यावसायिक कर्जासह क्रेडिट सुविधा देतात. अशी कर्जे अनेकदा स्पर्धात्मक व्याजदर आणि लवचिक परतफेडीच्या अटीवर दिली जातात.

कृषी कर्जे -

काही सहकारी बँक आहे हा कृषी सहकारी बँका म्हणून तयार केल्या जातात अशा बँका शेतकऱ्यांसाठी योग्य दरात कर्जपुरवठा करतात. कृषी सहकारी बँक या कर्जासोबतच शेतीसाठी लागणारे उपकरणे, पीक कर्ज, बियाणे कर्ज इत्यादी कर्ज पुरवठा करतात.

सामाजिक आणि विकासात्मक उपक्रम -

सहकारी बँका ह्या लोकांच्या आर्थिक व सामाजिक विकासासाठी समाज उपयोगी उपक्रमांचा भाग असतात. सहकारी बँका ह्या शेतकऱ्यांसाठी शेती व शेतीवर आधारित प्रकल्प, पायाभूत सुविधा इत्यादीचा विकास करण्यासाठी समाज कल्याण कार्यक्रमांमध्ये गुंतवणूक करू शकतात.

अन्य बँकींग सेवा पुरविणे-

जसे चेक, हुंड्या, वचनचिठ्ठी इ. चे पैसे वसुल करणे व देणे खातेदाराच्या वतीने बिले, विम्याचे हप्ते, भाडे, वर्गणी, लाभांश, वेतन इत्यादी गोळा करणे, खातेदाराच्या

वतिने शेअर्स कर्ज रोख्याची खरेदी विक्री करणे, मोठ्या रक्कमा अत्यल्प खर्चात एका ठिकाणाहुन दुसऱ्या ठिकाणी चेकच्या साह्याने पाठविणे.

मेल ट्रान्सफर, ड्राफ्ट, टेलिग्राफीक ट्रान्सफर, विश्वस्त, मृत्युपत्र व्यवस्थापण, ग्राहक व खातेदाराचा प्रतिनिधी म्हणून कार्य करणे, आयकर व आयकर पत्रके भरणे, विक्रीकर ट्रेझरीत भरणे, रेल्वे तिकिट मिळवून देणे, ऑनलाईन बँकेची सुविधा मिळवुन देणे इ. प्रकारच्या सेवा पुरविण्याचे काम बँका करतात. मैल्यवान वस्तु सुरक्षित ठेवणे म्हणजे लॉकर सुविधा पुरविणे, प्रवाशी चेक देणे, हमीपत्र देणे, क्रेडीट कार्ड पुरविणे भागविमे म्हणून कार्य करणे, ग्राहकांना गुंतवणुकीबद्दल सल्ला देणे इत्यादी असे अनेक प्रकारच्या सेवा सहकारी बँका पुरवतात.

संशोधनाची निवड-

भारतातील इतर भागाप्रमाणेच महाराष्ट्रातील नांदेड जिल्ह्यातसुद्धा सहकारी बँकांचे जाळे पसरलेले आहे. या सहकारी बँका विविध योजनेच्या माध्यमातून जनतेपर्यंत सेवा पोहोचविण्याचे कार्य करत असतात. नांदेड जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या आर्थिक व सामाजिक विकासात त्यांचे योगदान महत्वपुर्ण असुन त्यात सहकारी बँकांही महत्वपुर्ण भुमिका बजावतात. त्यामुळे सहकारी बँकांचा अभ्यास करणे संशोधकाला आवश्यक वाटले. त्यामुळे नांदेड जिल्हा या अभ्यास क्षेत्राची निवड केली गेली आहे.

संशोधन साहित्याचा आढावा-

संशोधन कर्त्याने “नांदेड जिल्ह्यातील शेतकऱ्यांचा आर्थिक व सामाजिक विकासात सहकारी बँकेची भुमिका” हा विषय निवडण्यापुर्वी पुर्व संशोधन साहित्याचा मागोवा घेतलेला आहे.

1) **सदामते मोहन -2004 -** यांनी आपल्या 'नागरी सहकारी बँका नव्या वळणावर' या प्रस्तुत लेखात नागरे सहकारी बँका समोर असणाऱ्या समस्यांचा अभ्यासाचा उल्लेख केला आहे. सहकारी बँकांना १९९१ नंतर सातत्याने आव्हानांना तोंड

द्यावे लागले आहे. सहकारी बँकांच्या नवीन वर्गवारीचा हिशोब उल्लेख केला आहे. नवीन वर्गवारी दोनशे गुणांची असून 180 पेक्षा गुण असेल तर ए + वर्गवारी ठरणार आहे. हे अभ्यासावरून लेखकाने असं निष्क्रिय काढला आहे की 200 गुणांची परीक्षा पास करण्यासाठी बँकांना आर्थिक अडचण येणार आहे.

2) **नागरी सहकारी बँकाप्रा शाम साळुंखे, डॉ निलेश गावडे:** यांनी आपल्या बँकिंग ची तत्वे आणि पद्धती भाग एक व भाग दोन मध्ये बँकांचे संरचना याविषयी मुद्देसूद पदे मांडणी केलेली आहे. ज्यामध्ये भारतीय बँकांचे महत्व व्यापारी बँकेची मूलतत्त्वे रोग तत्वे सहकारी बँकेची कार्य चलन धोरण बँकेची भूमिका चलन विषय धोरण रिझर्व बँक ऑफ इंडिया प्राथमिक बाजार दुय्यम बाजार इत्यादी संबंधित सविस्तर विवेचन केलेले आहे. ज्यातून महाराष्ट्रातील सर्वसामान्य जनतेला बँकेविषयी माहिती देण्याचे काम व जागृत करण्याचे काम केले आहे.

3) **बट नारायण : १९७४-**

भट यांनी सन १९६९ते १९७२ या काळातील व्यापारी बँकांनी कृषीक्षेत्रस केलेल्या पतपुरवठ्याच्या गुणवत्तेचे आणि कर्ज वसुलीचे विश्लेषण केले आहे या विश्लेषण असे आढळून आले आहे की व्यापारी बँकांनी कृषीक्षेत्र पुरवठा करून चांगली कामगिरी केली आहे. कृषी क्षेत्रात केलेल्या पतपुरवठ्याच्या वसुली बाबत फारच उदासीनता दिसून आली.नारायण बट यांनी असे सुचवले आहे की कृषी कर्ज वसुलीच्या बाबतीत सुधारणा घडवून आणणे आवश्यक आहे.

4) **डॉ. बी. जी. बानुबाकोडे :** यांनी १९८९ मध्ये आचार्य पदवीकरिता अमरावती विद्यापीठात सादर केलेल्या “A Study of the impact of decentralization of powers in Panchayati Raj system or rural development in Amravati taluka” या विषयाच्या शोध प्रबंधात पंचायतराज संस्थानी दिलेल्या अधिकाराचा जिल्ह्याच्या विकास कार्यावर

सकारात्मक प्रभाव पडलेला आहे. असा निष्कर्ष काढला.

5) **डॉ. विद्याधर अनास्कर :** यांनी आपल्या बँकांविषयी सर्व काही या लेखमालेत थकबाकीदाराचे नावे कर्ज पहिल्या दिवसापासून एन.पी.ए. होवू शकते आणि बुडित कर्जाचे निलेखन करणे ही सहकारी व व्यापारी बँकांच्या दृष्टीने काळाची गरज आहे असे मत मांडले. यानी अग्रक्रम क्षेत्रामध्ये कोणकोणत्या उद्देशाने नागरी बँकांना अर्थसहाय्य केलेले आहे. याचे विश्लेषण केलेले आहे. तसेच नागरी बँकांच्या कार्यप्रणालित उणीवा संबंधी महत्वपुर्ण शिफारशी केल्या आहेत.

6) **डॉ. वंदना मिश्रा :** यांनी अमरावती विद्यापिठात सादर केलेल्या “An analytical study of the role played by the nationalized banks in the development of the small scale industries in Akola district.” या शोधप्रबंधामध्ये राष्ट्रीयकृत बँकांच्या अकोला जिल्ह्यातील लघुउद्योग विकासातील कार्याची भुमिका विषद केली आहे.

परंतु नांदेड जिल्ह्याच्या शेतकऱ्यांच्या आर्थिक व सामाजिक विकासाच्या अनुषंगाने सहकारी बँकांचा अभ्यास मोठ्या प्रमाणात झालेल्या नाही. म्हणून नांदेड जिल्ह्याच्या पतपुराव्यामध्ये महत्वाची भुमिका बजावणाऱ्या व्यापारी बँकांच्या कार्याचे अध्ययन करण्याच्या दृष्टीने संशोधन कर्त्याने प्रस्तुत विषयाची निवड केली आहे.

या विषयाच्या उपयुक्ततेबाबत खालील बाबीवरून ही खात्री पटण्यास मदतच होते. जसे,

१९८६ च्या प्रो.ए.एम. खुसरो समितीने वर्ष २००० पर्यंत दारिद्र निर्मुलण करण्याकरता ग्रामिण पतपद्धतीचा विकास करण्यावर भर द्यावा असे म्हटलेले आहे.

डॉ. जहागिरदार म्हणतात बँकांच्या उदासिन धोरणांमुळे सर्वसामान्य लोकांचे कर्ज ठेवी अनुपात हा ४०% पर्यंत घटलेला आहे. बँकांनी केवळ

कर्जपुरवठा न करता शेतकऱ्यांची आर्थिक व सामाजिक स्थिती अशा सर्व बाजूने मदत करावी.

श्री. अरविंद घोष यांनी आपल्या लेखात पाण्याचे परिक्षण करण्याचे प्राचिन तंत्र व पाणी साठवण्याचे आधुनिक तंत्र यांचा अंगिकार करून पिण्याचे पाणी व सिंचनाकरिता पाणी पुरवठा इ. करिता लक्ष केंद्रीत करून कृषि उत्पादन व विपननावर लक्ष केंद्रीत करण्याची आवश्यकता प्रतिपादन केली आहे.

संशोधनाची उद्दिष्टे-

संशोधनासाठी निश्चित करण्यात आलेली उद्दिष्टे खालीलप्रमाणे-

1) जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचा अभ्यास करणे.
2) सहकारी बँकांचे नांदेड जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या आर्थिक व सामाजिक विकासातील योगदान अभ्यासणे.
3) सहकारी बँकांच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची व ध्येयधोरणांची शेतकऱ्यांसाठी उपयुक्तता पडताळणे.
4) जिल्ह्यातील सहकारी बँकांच्या वित्तीय कामगिरीचा अभ्यास करणे.
5) सहकारी बँकांना शेतकऱ्यांसंबंधी उद्भवणाऱ्या समस्या.
6) शेतकऱ्यांच्या आर्थिक व सामाजिक विकासाच्या कक्षा रुंद करण्याच्या दृष्टीने सहकारी बँकांची उपायोजना.

संशोधनाची ग्रहितके-

संशोधनासाठी निश्चित करण्यात आलेली गृहितके खालील प्रमाणे-

1) सहकारी बँकांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना योग्य सवलतीत कर्जपुरवठा होतो.
2) सहकारी बँकांमुळे शेतकऱ्यांच्या जीवनात आर्थिक स्थैर्य निर्माण होते.
3) सहकारी बँकांच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या पैशाची, ठेवींची व सुरक्षितता दिली जाते.

4) शासनाच्या विविध योजनांचा लाभ शेतकऱ्यांना विविध सेवा क्षेत्राच्या माध्यमातून मिळत आहे.
5) खाजगी व्याजदराच्या जाचातून शेतकऱ्यांची सुटका, सहकारी बँकांनी अल्प व्याजदर देऊन केली आहे.
6) व्यापारी बँकांच्या कर्ज वितरणातून औद्योगिक मदत, कृषी सहाय्य व तारण ठेवीतून शेतकऱ्यांचे हित साधते.
7) जिल्ह्यातील सहकारी बँकेची व्यवस्थापकी कार्यपद्धती कार्यक्षम आहे.

संशोधन विषयाची व्याप्ती-

प्रस्तुत संशोधनात नांदेड जिल्ह्यातील शेतकऱ्यांची आर्थिक व सामाजिक विकासात सहकारी बँकांची भुमिका ही प्रस्तुत विषयाची व्याप्ती आहे. न्यादर्श आराखडा तयार करण्यासाठी विविध अभ्यासक्षेत्र निवडली आहेत. जिल्ह्यातील आर्थिक, सामाजीक आणि भौगोलिक विविधता विचारात घेऊन जिल्ह्याचे एकूण तालुका खंडाच्या आधारावर 16 गट पाडण्यात आलेले आहेत. त्यांच्या विकास अवस्थाचा अभ्यास करण्यासाठी बँका, शेतकरी, कुटूंब, व्यावसायीक, मजुर याप्रमाणे रचना करण्यात आलेली आहे.

संशोधन विषयाचे महत्व-

भारत हा कृषीप्रधान देश असल्यामुळे इथली जवळपास ५० टक्के लोकसंख्या शेतीवर अवलंबून आहे. त्यामुळे इथला शेतकरी व शेतकऱ्यांचा आर्थिक आणि सामाजिक विकास या संशोधनाचा गाभा आहे. प्रत्येक राष्ट्राच्या आर्थिक व सामाजिक विकासात बँका फार महत्वाची जबाबदारी पार पाडत असतात. अर्थव्यवस्थेतील एकूण पैशाचा फार मोठा भाग त्याच्याकडे जनतेकडून ठेवीच्या रुपाने आलेला असतो. त्यामुळे बँका राष्ट्राच्या आर्थिक प्रगतीचा वेग, दिशा व स्वरुप यांच्यावर दुरगामी परिणाम करू शकतात. सर्वसामान्य जनता, शेतकरी, व्यापारी,व्यापार करण्याच्या व्यक्ती तसेच

उत्पादक यांच्या दरम्यान महत्वाचा दुवा म्हणून बँक महत्वाची जबाबदारी पार पाडत असते. सर्वसामान्य शेतकऱ्यांसमोर असलेला महत्वाचा प्रश्न म्हणजे कमावलेला पैसा सुरक्षित राहिल किंवा नाही या प्रश्नाचे उत्तर बँक देते. एवढेच नव्हेतर पैशाच्या सेवेशिवाय ही तर सेवा बँका जनतेला उपलब्ध करून देतात.

जनतेकडे असलेला पैसा बँकांकडे येत असल्यामुळे बँका हा पैसा ज्या व्यक्तींना गरज आहे अशा व्यक्तींना कर्जाऊ देतात. अशा रितीने बँका एकाच वेळी कर्जदेय व कर्जदार अशा दुहेरी भुमिका बजावतात. एका व्यक्तीकडून दुसऱ्या व्यक्तीकडे तसेच एका ठिकाणाहुन दुसऱ्या ठिकाणाकडे भांडवलाचा ओघ प्रभावित केला जातो. त्यामुळे उत्पादनासाठी नविन उद्योगधंद्यांना चालना मिळते. यामुळे या प्रक्रियेचा अभ्यास महत्वपुर्ण ठरतो. त्यामुळे या विषयाचे महत्व असणार आहे.

संशोधन पद्धती-

प्रस्तुत संशोधन विषयाचा अभ्यास करण्यासाठी प्राथमिक व दुय्यम तथ्यावर आधारित आहे. उपलब्ध समस्यामधुन संभाव्य परिणाम शोधणे हे संशोधकाचे प्रमुख उद्दिष्ट असल्याने, माहिती संकलनाच्या दृष्टीने संशोधनाला अचुकता असली पाहिजे. प्रस्तुत संशोधनासाठी नांदेड जिल्ह्यातील काही निवडक सहकारी बँकांची निवड करण्यात आली आहे. त्याचबरोबर आर्थिक व सामाजिक विकासाची पडताळणी करण्यासाठी नमुना आराखडा तयार करण्यात येणार आहे. यासाठी बँकांचे वार्षिक अहवाल ऑडिट रिपोर्ट, वेळोवेळी प्रसिद्ध होणारे सर्वसाधारण सभांचे अहवाल शासनाच्या जनकल्याण योजनांचा अहवाल इत्यादीचा वापर करण्यात येणार आहे. प्रकाशित, अप्रकाशित शोधप्रबंध इंटरनेट जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन काही घटकांच्या मुलाखतीद्वारे माहिती मिळवून त्याचे विश्लेषण करण्यात येईल. ही आकडेवारी स्पष्ट करण्यासाठी नकाशे, छायाचित्रे, आलेख पद्धतीचा वापर करण्यात येईल.

प्राथमिक तथ्य-

अभ्यासाच्या दृष्टीने आवश्यक असलेले विषय, तथ्य विविध घटकांकडून प्राप्त करून घेण्यात येणार आहे. जिल्ह्यातील गटविकास अधिकारी, कृषी अधिकारी, बँकांचे शाखाधिकारी, ग्राम विकास अधिकारी, व्यावसायीक, शेतकरी, मजुर इत्यादी च्या प्रत्यक्ष भेटीतून मुलाखत व प्रश्नावली तंत्राच्या आधारे माहिती मिळवली जाणार आहे. त्याकरिता अनुसुचि तयार करण्यात येणार आहे.

दुय्यम तथ्य-

दुय्यम स्त्रोतामध्ये जिल्ह्यातील सहकारी बँकांकडून व जिल्ह्याच्या अग्रणी बँकेकडून प्रकाशित होणारे वार्षीक अहवाल रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे वार्षीक अहवाल, मासिक अहवाल, राज्याच्या सांख्यिकीय विभागाकडुन प्रकाशन जिल्हा वार्षीक समालोचने, मंत्रालयातुन संचनालयातुन नांदेड जिल्हा संबंधी प्रकाशित माहिती तसेच विविध मासिके, पाक्षिके, वर्तमान पत्रातील प्रकाशित माहिती, ग्रंथ, नियतकालिके, अधिकृत नोंदी आणि इंटरनेटवरील इतर प्रकाशित साहित्याचा आवश्यकतेनुसार अभ्यास केला जाणार आहे.

संकलित माहितीचे वर्गीकरण करण्यासाठी एक-मार्गी- व्दिमार्गी आणि बहु-वेरियंट सारणी वापरून सारणीबद्ध केली जाणार आहे. माहितीचे विश्लेषण करण्यासाठी सरासरी, टक्केवारी, मानक विचलन आणि भिन्नता यासारखी साख्खिकीय साधने उपोयगात आणली जातील. तसेच ग्रहितके तपासण्यासाठी, सांख्यिकीय चाचण्या उदा- SPSS आणि MS Excel च्या मदतीने ची-स्केअर चाचणी, सहसंबंध आणि ANOVA चाचण्याची मदत घेतली जाईल.

संशोधनाची मर्यादा-

1) संशोधन कार्याला नांदेड जिल्हा ही क्षेत्रिय मर्यादा आहे.
2) जिल्ह्याच्या आर्थिक विकासाच्या अनुषंगाने संपुर्ण सरकारी विभागाच्या कार्याचे मुल्यांकण करण्यास मर्यादा आहेत.
3) संशोधन कार्याची माहिती मागील दहा वर्षाशी संबंधीत आहे. म्हणजे २०१६ ते २०२५.
4) प्रतिसादकर्त्याची निवड करतांना चुक होण्याची शक्यता आसते त्याचा आर्थ आणि निष्कर्षावर होऊ शकतो.

प्रकरण रचना-

प्रकरण पहिले -	प्रस्तावना
प्रकरण दुसरे -	संशोधन साहित्याचा आढावा
प्रकरण तिसरे -	नांदेड जिल्ह्यातील शेतकऱ्यांची आर्थिक व सामाजिक स्थिती
प्रकरण चौथे -	नांदेड जिल्ह्यातील सहकारी बँकेच्या आर्थिक स्थितीचा आढावा
प्रकरण पाचवे	संशोधन क्षेत्रातील न्यादर्श सर्वेक्षणांतर्गत प्राप्त तथ्याचे वर्गीकरण व निर्वचन
प्रकरण सहावे -	सारांश, निष्कर्ष आणि शिफारशी

संदर्भग्रंथ-

1) दामाजी शहा, (२००५), सहकार, फडके प्रकाशन, कोल्हापूर.
2) आर बी गुप्ता, भारतातील सहकारी पत आणि बँकिंग,
3) प्रा. गोखले रामचंद्र महादेव (१९६६), बँक व्यवसाय मुळ तत्वे आणि भारतातील

बँका, कॅन्टिनेटल प्रकाशन, पुणे.

4) प्रा. बोरीकर अशोक, बँकींग तत्वे आणि ग्रामिण विकास, विद्या प्रकाशन, नागपूर

5) प्रा. वनमाली प्रा. सरोदे, सहकाराची रुपरेषा, विद्या प्रकाशन, नागपूर

6) आगलावे प्रदिप, (२०००), सामाजिक संशोधन पद्धतिशास्त्रे व तंत्रे, विद्या प्रकाशन, नागपूर

7) प्रा.पहुरकर बी.बी.,(1998), बँक व्यवसाय आणि वित्त, पिंगलापुरे अड.कं. पब्लिशर्स.

8) काचोळे दा.धो. (1993) सामाजिक संशोधन पद्धती, कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद

9) भांडारकर ... पु.ल. (1999) सामाजिक संशोधन पद्धती, विद्या बुक्स, औरंगाबाद

10) योजना मासिक, माहिती व प्रसारण मंत्रालय भारत सरकार नवी मुंबई, ऑगस्ट 2024.

11) www.wikipedia.org

संशोधक

सारिका संजय रताळे

मार्गदर्शक

डॉ.रेश्मा डोईफोडे

एम. कॉम., डी.बी.एम.,एम.फिल., पीएच.डी.,

संशोधक मार्गदर्शिका

पीपल्स कॉलेज, नांदेड